## मा. गोपीनाथ मुंडे यांचा जीवन परिचय

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | **गोपीनाथ पांडुरंगराव मुंडे** |
| **वडिलांचे नांव** | : | पांडुरंगराव नागोजीराव मुंडे |
| **आईचे नांव** | : | लिंबाबाई पांडुरंगराव मुंडे |
| **जन्म दिनांक** | : | 12 डिसेंबर, 1949 |
| **जन्म स्थान** | : | नाथरा, ता.परळी, जि. बीड |
| **शिक्षण** | : | बी. कॉम.- खोलेश्वर महाविद्यालय, आंबेजोगाई<br>डी.एल.एल. लॉ कॉलेज, पुणे |
| **पत्ता** | : | मु. पो. परळी वैजनाथ,<br>ता. आंबेजोगाई, जि. बीड. |
| **परिवार** | : | चार भाऊ, एक बहीण, पत्नी, तीन मुली |
| | : | गरीब शेतकरी कुटुंबात जन्म |
| | : | घराण्यात कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतांनाही समर्थ लोकनेते. |
| | : | अत्यंत कमी शिक्षित अशा घराण्यातील पहिले पदवीधर. |
| | : | पुण्यातील मोतीबाग संघ कार्यालयात राहून उच्च शिक्षण. |
| | : | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक. नंतर विद्यार्थीदशेत विद्यार्थी परिषदेचे काम. |
| **1971-1973** | : | आंबेजोगाई येथे कॉलेजमध्ये विद्यार्थी परिषदेचे शहर मंत्री म्हणून जबाबदारी. |
| **1974** | : | पुण्यात लॉ च्या (विधी अभ्यासक्रमाच्या) शेवटच्या वर्षात असतांना आणीबाणीच्या विरोधात आंदोलनात सहभाग व कारावास. |
| | : | जयप्रकाश नारायण यांच्या नवनिर्माण आंदोलनात छात्र संघर्ष समितीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष. |
| | : | जयप्रकाश नारायण मानपत्र समितीचे महाराष्ट्राचे निमंत्रक. पुणे येथे मानपत्र प्रदान कार्यक्रम. |
| **1975** | : | आणीबाणी विरोधी आंदोलनाबद्दल वॉरंट. तीन महिने भूमिगत राहून संघाचे पूर्णवेळ काम. औरंगाबाद येथे आणीबाणीच्या विरोधी सत्याग्रहाचे नेतृत्व. सत्याग्रहामध्ये D.L.L. कलमाखाली अटक व हर्सुल, जि.औरंगाबाद येथे कारावास. तेथून सुटल्यावर जेलमधून बाहेर येताच 'मीसा' कायद्याखाली अटक करून नाशिक कारागृहात रवानगी. 16 महिने कारावास. |
| **1977** | : | नाशिक कारागृहातून सुटका. |
| **1977** | : | जनता पार्टीमध्ये (अध्यक्ष, एस.एम.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली) महाराष्ट्र राज्याचे सहसचिव. |
| **1978** | : | प्रथमच विधानसभेची निवडणूक लढविली. (रेणापूर मतदारसंघ) पराभूत. |
| **1978** | : | उजनी मतदारसंघ ता.परळी, जि.बीड येथून जिल्हा परिषदेवर निवड. |
| **1980** | : | रेणापूर येथून विधानसभेवर निवड. |
| **1980** | : | जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष. |
| **1982** | : | भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस. |
| **1984** | : | प्रदेश सरचिटणीस म्हणून पुन्हा निवड. |
| **1986** | : | 15 फेब्रुवारीला नागपूर अधिवेशनात भारतीय जनता पार्टी **महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी निवड.** देशातील सर्वात तरुण प्रदेश अध्यक्ष म्हणून गौरविण्यात आले. |
| | : | उत्कृष्ट संघटक - कै.वसंतराव भागवत व शेतकरी नेते कै.उत्तमराव पाटील यांच्या दूरदृष्टीने शेवटच्या स्वयंसेवकास अग्रेसर म्हणून जबाबदारी मिळाली व ती सार्थ ठरली. |

1987 : 28 नोव्हेंबर रोजी अकोला अधिवेशनात भाजपा महाराष्ट्र **प्रदेश अध्यक्षपदी** पुन्हा निवड.

1990 : भारतीय जनता पार्टी **विधीमंडळ गटाचे नेते** म्हणून निवड.

1992 : 12 डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य विधानसभेचे **विरोधी पक्षनेता** म्हणून निवड. आपल्या वाक्‌चातुर्याने, प्रभावी वक्तृत्वाने, प्रखर भाषणांनी विरोधी पक्षनेतेपदाची उंची वाढविली. अविस्मरणीय अशी कामगिरी केली.

**चळवळ, लढे व संघर्ष**

1978 : औरंगाबाद विद्यापीठाच्या नामांतराकरिता झालेल्या लढ्यामध्ये अग्रेसर. नामांतरासाठीच्या लाँगमार्च मध्ये सहभाग. अनेक वेळा सत्याग्रह व कारावास 1984 ते 86 मंडल आयोग लागू करण्यासाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व. संपूर्ण देशात मंडल आयोग लागू झाला.

: कल्याण, जि.ठाणे येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन. 15 दिवस कारावास.

1989 : शेतकऱ्यांच्या 'कर्जमुक्ती'ची यशस्वी चळवळ. शासनास 'कर्जमुक्ती' करण्यास भाग पाडले.

1988 : 10 मार्च रोजी दोन लाख शेतकऱ्यांच्या मुंबई मंत्रालयावरील मोर्चाचे नेतृत्व.

1989 : 16 डिसेंबर रोजी नागपूर येथे विधानसभेवर ऐतिहासिक अभूतपूर्व शेतकरी मोर्चाचे आयोजन. राज्यातून सात लाखावर शेतकऱ्यांच्या मोर्चात सहभाग.

1994 : शिवनेरी ते शिवतीर्थ अशी राज्यव्यापी **संघर्ष यात्रा**. राजकारणाचे अपराधीकरणाविरोधी जनजागरण चळवळीला मोठे जनसमर्थन.

1995-1999 : महाराष्ट्राचे **उपमुख्यमंत्री** म्हणून निवड. गृह, अर्थ, पाटबंधारे, ऊर्जा इत्यादी खात्यांचा कारभार समर्थपणे सांभाळला. राज्याच्या विकासाला गती देऊन राज्याला नवी दिशा दिली. प्रशासनात कामाची संस्कृती आणली.

**काही महत्त्वाचे निर्णय**

1. संघटित गुन्हेगारी विरोधात मोका कायदा.
2. गुंतवणुकदारांना संरक्षण देणारा कायदा.
3. भटके विमुक्त जमातीसाठी वेगळे मंत्रालय.
4. इतर मागास जाती व आर्थिक दुर्बलांच्या विकासाकरिता स्वतंत्र महामंडळ.
5. पोलीस मॅन्युअलमधून गुन्हेगार म्हणून उल्लेखित जाती काढून टाकल्या.
6. 400 गुंडांना यमसदनास पाठवून मुंबई व राज्यातील गँगवार संपुष्टात आणले. दंगामुक्त महाराष्ट्र अशी प्रतिमा निर्माण केली.

2000-2003 : भारतीय जनता पार्टीच्या **राष्ट्रीय उपाध्यक्षपदी** निवड

2002-2003 : अक्कलकोट ते कल्याण सलग 90 दिवसांची **संघर्ष यात्रा**. वीज, दुष्काळ, शेतकरी व जनतेच्या प्रश्नांवर तसेच भ्रष्ट, अकार्यक्षम सरकारच्या विरोधात जनजागरण.

2003-2006 : भारतीय जनता पार्टी-महाराष्ट्र **प्रदेश अध्यक्षपदी** निवड (25 ऑगस्ट, 2003)

2004 : भारतीय जनता पार्टी **विधीमंडळ गटाचे नेते** म्हणून निवड (3 नोव्हेंबर, 2004)

2007 : भारतीय जनता पार्टी **राष्ट्रीय सरचिटणीस** म्हणून निवड

**सहकार क्षेत्रातील अग्रणी - यशस्वी उद्योजक**

1999 : सहकारी चळवळीला नवी दिशा.

: आधुनिक तंत्रज्ञान व कार्यक्षम व्यवस्थापन, कमी वेळात व कमी पैशात जास्त उत्पादन. या त्रिसूत्रीचा अवलंब करून चालविलेल्या देशातील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना.

: वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष. राज्यात 30 नव्या साखर कारखान्यांची निर्मिती. साखर उद्योगास नवी दिशा दिली. ऊसापासून वीज व इथेनॉल प्रकल्पांची निर्मिती करून साखर उद्योगास नवसंजीवनी प्राप्त करून दिली. ऊसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मिती करणाऱ्या देशातील पहिल्या प्रकल्पाची उभारणी केली. त्याचे मा.उपपंतप्रधान श्री.लालकृष्ण अडवाणी यांनी उद्‌घाटन केले.



-------